॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++' grade

**Academic Planning & Development Section**

**Phone: (02462) 215542** **Website: www.srtmun.ac.in** **E-mail: apds@srtmu.ac.in**

**राष्ट्रीय शिक्षण धोरण—२०२० अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयातील सर्व प्राचार्यासमवेत सहविचार सभेच्या आयोजना बाबत..**

## प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संबधितांना आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षण मंत्रालय, भारत सरकारद्वारे राष्ट्रीय शिक्षण धोरण—२०२० ची अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना पारित झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग, ए.आय.सी.टी.ई, महाराष्ट्र शासन यांनी देखील प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार राष्ट्रीय शिक्षण धोरणातील उच्च शिक्षण संदर्भात विचार मंथन करण्यासाठी दिनांक ३० जून २०२२ रोजी सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहविचार सभेचे विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. सदर सभेस मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, श्री विकास चंद्र रस्तोगी व मा. संचालक, उच्चशिक्षण महाराष्ट्र राज्य, डॉ धनराज माने हे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच, मा. कुलगुरू डॉ. उद्धव भोसले व मा. प्र—कुलगुरू डॉ. जे. एम. बिसेन व इतर मान्यवरांचा देखील या सहविचार सभेत सहभाग असणार आहे.

तरी आपणास विनंती की, सदर सहविचार सभेसाठी सर्व प्राचार्यांनी उपस्थित राहून राष्ट्रीय शिक्षण धोरण—२०२० च्या प्रत्यक्ष अंमलबजावणी संदर्भात आपले अभ्यासपूर्ण विचार मांडावेत. त्याचप्रमाणे आपले विचार/सूचना लेखी स्वरूपात apds.srtmun@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावेत व एक प्रत सोबत आणावी. सदर सहविचार सभेतील विचार मंथनाचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात येईल.

- सदर बैठकीस उपस्थित राहणेसाठी दिनांक ३०.०६.२०२२ रोजीची कार्यरजा मंजुर करण्यात येत आहे.

दि. ३० जून २०२२ रोजीच्या सहविचार सभेचे वेळापत्रक व कार्यक्रमाचे स्वरूप खालील प्रमाणे

| वेळ | कार्यक्रमाचे स्वरूप |
|---|---|
| १०:३० | सहविचार सभेचे उद्घाटन |
| १०:३५ ते १०:४५ | मा. कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांचे प्रास्ताविक |
| १०:४५ ते ११:०० | मा. संचालक, उच्च शिक्षण, म.रा. डॉ. धनराज माने यांचे मार्गदर्शन |
| ११:०० ते १२:३० | मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, म.रा., श्री विकास चंद्र रस्तोगी यांचे मार्गदर्शन |
| १२:३० ते १:०० | मा. कुलगुरू यांचे राष्ट्रीय शिक्षण धोरणावर सादरीकरण |
| १:०० ते १:४५ | भोजन—मध्यांतर |
| १:४५ ते २:३५ | मा. प्र—कुलगुरू व अधिष्ठाता आपले विचार मांडतील |
| २:३५ ते ३:३० | मा. कुलगुरू यांचे राष्ट्रीय शिक्षण धोरणावर विस्तृत सादरीकरण |
| ३:३० ते ५:४० | उपस्थित सदस्यांकडून विचार मांडणी |
| ५:४० | कार्यक्रमांचा समारोप व आभार प्रदर्शन |

टिप :— सदर सहविचार सभेसाठी उपस्थित राहाण्यासाठीचा प्रवास खर्च संबधित महाविद्यालयाकडून अदा करण्यात यावा.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड — ४३१ ६०६.
**जा.क्र.:**शैनिविवि/परिपत्रक/राशिधो—२०२०/२०२२—२३/485
दिनांक : २५ जून २०२२

आपली विश्वासू,

**सहा.कुलसचिव**
शैक्षणिक नियोजन व विकास विभाग

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.